जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र.२९८९ दि. १४/०९/२०१९**

## वारजे माळवाडी पोलीस स्टेशन

## खुनाच्या प्रयत्नातील आरोपी केले काही तासात जेरबंद

वारजे माळवाडी परिसरात राहणारे मंगेश दिगंबर क्षिरसागर यांची धनंजय चौधरी व सिध्दु भुंबे यांचेशी जवळीक मैत्री आहे.त्यांची गौरव पासलकर व रोहित पासलकर या नातेवाईकात वर्चस्वामध्ये भांडणे झाली होती. त्यापैकी गौरव पासलकर यांच्याशी फिर्यादी याची मैत्री आहे.दि.१२/०९/२०१९ रोजी रात्रौ.००/०५ वा.ते ००/२० वा.अगर त्या सुमारास म्हसोबा मंदिरासमोर रोडवर तसेच ओंकार कॉलनी नं.०१,अंजिरा निवास समोर रोडवर वारजे पुणे येथे आरोपी नामे - १) रोहित पासलकर २) संकेत शिंदे ३) ओंकार सातपुते ४) भैय्या शेडगे ५) साहिल मोरे ६) सुरज भोरडे सर्व रा.वारजे माळवाडी पुणे या गैरकायदयाची मंडळी जमवुन फिर्यादी यांचा जाण्याचा रस्ता आडवुन त्यांना प्रतिबंध करुन तुझे मित्र पल्या चौधरी व सिध्दु भुंबे कोठे आहे अशी विचारणा करुन अ.क्र. २ याने फिर्यादी यांना गाडी आडवी घालुन शिवीगाळी,दमदाटी करुन तसेच अ.क्र.३ व ५ यांनी त्यांचेकडील कोयत्याने फिर्यादीचे डोक्यात, हातावर व पाठिवर वार करुन अ.क्र. १ ते ६ यांनी पकडुन ठेवुन फिर्यादी यांना जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. याबाबत वारजे मालवाडी पोलीस स्टेशन येथे गु र नं ३४१/२०१९ भा.द.वि. ३०७,१४१,१४३, १४४, १४८,१४९,३४१,३२३,५०४,५०६ आर्म ॲक्ट ४(२५) व महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१) आर.डब्लु १३५प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला. गुन्हा नोंद होताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री अशोक कदम यांचे मार्गदर्शनाखाली गणेशोत्सव विसर्जन मिरवणूक बंदोबस्त असताना देखिल तपास पथकाने आरोपी नामे संकेत चंद्रकांत शिंदे वय २३ वर्षे रा वाराणसी सोसा गोकुळनगर वारजे माळवाडी पुणे २) रोहीत वसंत पासलकर वय २७ वर्षे रा म्हाडा वसाहत जे बि प्लॅट नं १११ वारजे माळवाडी पुणे यांना शिताफीने अटक काही तासात अटक केली आहे.